**।। श्री भार्गवराम ।।**

**दशावतार मंडळ परशुराम ...**

**।। मंगलचरण ।।**

भार्गव चरणा भव भय हरणा ।
नमितो मी त्या खलदमना ।।धृ।।
वाशिष्ठी नदी संन्निध गिरीवर ।
वासकरोनी रक्षी जना ।।१।।
शिवहृदयालय तो सुखदायक ।
वंदीसुरजिय श्रीरमणा ।।२।।
राज्य दिधले दैत्य मर्दुनी ।
वर्णनी थकली कवी रसना ।।३।।

सकल सुरा नमुनी स्तवी मी तनमन अर्पुनी चरणी
सकल सुरा नमुनी स्तवी मी तनमन अर्पुनी चरणी
नाट्यारंभी गजवदनाते । नमुनी मन त्या सिंहाते ।
स्तवितो चरणा मी ही । सुरशा भाषा तोषा त्यजुनी ।
आवडी नाना विविध जनांची । नाना नाटकी दावुनी सांचि
भूमी नटवायाते । रमवा ते त्या कृती त्या करूनी ।।२।।

विविध जातीचे रसिक येत हे । विविध तयांची रसना ।।
विविध रसांनी युक्त अशा की । नाटकी रमवू यांना ।।
तेणे सकलांचे तोषित होईल मनसाचे ।।

सूत्रधार - एवढा वेळ मंगलचरण झाले आता थोडा वेळ ईश्वर भजन करू या.

रामचंद्र रघुवीर जय जय रामचंद्र रघुवीर ।।धृ।।
राघोबांची लीला गाता । हरती भय आणि चिंता
कृष्ण रामा रामा रामा । राम राया राघोबा
कृष्ण रामा रामा रामा । राम राया राघोबा
कृष्ण रामा रामा रामा । राम राया राघोबा
कृष्ण रामा रामा रामा । राम राया राघोबा

प्रारंभी विनंती करू गणपती । विद्या दयासागरा
अज्ञानत्व हरोनी बुद्धी मती दे । आराध्य मोरेश्वरा ।।
चिंता क्लेश दारिद्र्य दुःख अवघे । देशांतरा पाठवी ।।
हेरंबा गणनायका गजमुखा । भक्ता बहु तोषवी ।।

नेत्री दोन हिरे प्रकाश पसरे । अत्यंत ते साजिरे ।।
माथा शेंदूर पाझरे वरी बरे । दूर्वांकुराचे तुरे ।।
माझे चित्त विरे मनोरथ पुरे । देखोनी चिंता हरे ।।
गोसावी सुत वासुदेव कवीरे । त्या मोरयाला स्मरे ।।

सूत्रधार - इतका वेळ ईश्वर भजन करत असताना हा एकाएकी विचित्र पुतळा कोणता बरे आला असावा ? त्यालाच
विचारून पहावे. अरे बाबा, तू कोण ॠ(थोडा वेळ थांबून पुन्हा तेच विचारतो ) अरे बाबा, तू कोण ?

विदूषक - अहो कोण (मोठ्याने हसून ) कोन नाही, कोपरा नाही, त्रिकोण नाही, चौकोन नाही. शंका घेऊन
विचारण्याचे कारण नाही. (हसून मोठ्याने )

सूत्रधार - हा बहिरा नाही खास, याला बिथरवून चालायचे नाही (जवळ जाऊन पुन्हा विचारतो )
अरे बाबा, तुझं नाव काय ॠ

विदूषक - अहो माझी नाव कालच घाटावर गेली (मोठ्याने हसतो )

सूत्रधार - अरे पाण्यात चालणारी नाव घाटावर कशी जाईल? अरे या तुझ्या देहाला काय म्हणतात ते सांग.

विदूषक - या माझ्या देहाला अनंत नावं आहेत. यापैकी एक दोन चार सांगतो. आई म्हणते - जयपाल,
वडील म्हणतात - गोपाळ आणि लोक म्हणतात - ठणठणपाल (मोठ्याने हसतो)

सूत्रधार - अरे, लोक तुला ठणठणपाल म्हणतात त्याबद्दल तुला राग येत नाही ?

विदूषक- लोक मला ठणठणपाल म्हणतात म्हणून मी आईकडे गेलो तेव्हा आईने मला साकी म्हणून दाखवली
लक्ष्मीबाई वेची गोव-या । भिक्षा मागे धनपाळ ।
अमरसिंह तो मर गया । भला बिचारा ठणठणपाळ ।
आहे की नाही माझ्या नावात गंमत ! (मोठ्याने हसतो)

सूत्रधार - अरे ही झाली तुझी लौकिक नावं ! तुझ्या आईने तुला पाळण्यात घातले त्या वेळचे नाव सांग

विदूषक - म्हणजे तुला नावरसचे नाव पाहिजे ?

सूत्रधार - होय नावरसचं नाव हवंय.

विदूषक - अहो, हे चालू शक कोणते?

सूत्रधार - शालिवाहन शक

विदूषक - शालिवाहन शक (मोठ्याने हसतो ) त्याच्या पलीकडचा ?

सूत्रधार - विक्रम शक

विदूषक - विक्रमशक (मोठ्याने हसून ) त्याच्या मधला हा विदूषक ( मोठ्याने हसतो)

सूत्रधार - बा विदूषका, तू मला योग्य वेळी भेटलास (जरा बाजूला होऊन)(याला बिथरवून चालणार नाही)

विदूषक - भेटलात. अहो अजून आपण भेटलोत कुठे. प्रथम आपण भेटू या! मग म्हणा भेटलो म्हणून. (हसतो आणि मिठी मारतात)

सूत्रधार - झाले ना बाबा तुझे समाधान? बा विदूषका, या ठिकाणी हे लोक कशासाठी जमलेले आहेत, हे तुला माहीत आहे काय?

विदूषक- हे लोक ना, भोजनासाठी (हसतो)

सूत्रधार - अरे बाबा, हे लोक नुसते भोजनासाठी जमलेले नसून आज रामनवमी उत्सवानिमित्ताने या ठिकाणी दशवतार लीला नाट्य रूपाने करून दाखवण्याचे ठरले आहे. यासाठी तुझी मला मदत हवी आहे.

विदूषक - दशावतार लिलाव मीच करतो. घ्या हो कोणी दशेचा लीलाव एक वार दोन (पुन्हा तेच) घ्या हो कोणी दशेचा लीलाव एक वार तीन (पुन्हा तेच ) घ्या हो कोणी दशेचा लीलाव नको ना . नको ना. नको नको नको. (लाईट घालवतो)

सूत्रधार - अरे बाबा. दशेचा लिलाव नव्हे दशावतार लीला म्हणजे भगवंतांनी वेळोवेळी जे दहा अवतार घेतले ते नाट्य रूपाने करून दाखवायचे आहेत.

विदूषक- भगवंतांनी जे अवतार घेतले ते कोणते, ते सांग!

सूत्रधार - भगवंतांनी कोणते अवतार घेतले ते ऐक -

मत्स्यावासुनी चार ते नरहरीपर्यंत झाले कृर्तत्रेती वामन परशुराम तिसरा श्रीराम सीतापती
ऐसे हे अवतार सात मग तो द्वापारीचा आठवा
श्रीकृष्ण कालिमानी बौद्ध नववा कलंकी पुढे दहा

विदूषक - हे तुम्ही गाण्यामध्ये काय म्हटलंत ते काही मला समजले नाही जरा समजेल असं सांगा.

सूत्रधार - बा विदूषका, तुला समजेल असे सांगतो ऐक - मत्स्य, कूर्म, वराह हे चार अवतार भगवंतांनी कृतायुगात घेतले, वामन, परशुराम आणि राम हे तीन अवतार भगवंतांनी त्रेता युगात घेतले. आठवा श्रीकृष्ण अवतार भगवंतांनी द्वापार युगात घेतला बौद्ध संपून आता कली अवताराला सुरुवात झाली आहे.- आता तरी समजलं ना?

विदूषक - हे सर्व मला समजलं माझं नाव विचारून घेतलस; परंतु आपले नाव मला सांगितले नाहीस.

सूत्रधार - माझं नाव ना, मला भागवत असे म्हणतात.

विदूषक - वा. छान भा गवत वा माझी वृषभ रास असून बैलाचे जातक आहे; पण भा जातीचे गवत मी अजून काही पाहिले नाही. काय खोटारडा माणूस आहे हा भान भाकरी गहन गव्हाची आणि तुपाशिवाय नाही गिळायची वा! म्हणे भागवत!

सूत्रधार - बा विदूषका तुला हे नाव पसंत नाही असे दिसते तेव्हा तुला माझे दुसरे नाव सांगतो मला सूत्रधार असे म्हणतात.

विदूषक - बा. ... त्याच्याहून उंची नाव सांगितलंस

सूत्रधार - अरे बावा सर्वांची सूत्रे माझ्या हाती असल्यामुळे मला सूत्रधार म्हणतात.

विदूषक - म्हणजे तेलाला धार, तुपाला धार, पाण्याला धार, दुधाला धार एवढंच काय शस्त्रालासुद्धा धार आहे पण सुताला धार पाहिलीत का तुम्ही? (प्रेक्षकांना विचारतो व मोठ्याने हसतो ) सूत्रधार हो सर्वांची सूत्रे आपल्या हाती आहेत असे म्हणता पण माझी सूत्र तुमच्या हातामध्ये आहेत का? (मोठ्याने हसतो)

सूत्रधार - बा विदूषका, तुझी पण सूत्रं माझ्या हाती आहेत; पण ती वेळ आल्यानंतर मी तुला दाखवीन आता आपण दशावतार लीलेला सुरवात करू या.

विदूषक - दशावतार लीला करायची म्हणता खरं पण नाटक करायचं म्हटल्यावर त्याला संगीताची जोड असली तर नाटक अधिक चांगले होईल तेव्हा एखादे गाणे म्हणून दाखवू का ऋ

सूत्रधार - बा विदूषका, तुला जर गाणं येत असेल तर आपण संगीत नाटकच करू या. म्हण बघू एखादं गाणं.

विदूषक - म्हणूका गाणं. पेटीवाले ठेका नीट धरा. तबलेवाले स्वर नीट लावा. (कानावर हात ठेवून राग म्हणतो) सूत्रधारहो हा राग कोणता हो?

सूत्रधार - हा राग ना गर्दभ राग.

विदूषक - अगदी बरोबर ओळखलंत आता सुरुवात करतो.
पिकलेला फणस आपण फोडू या ।।धृ।।
गरे होतील म्हशीला चारखंडे होतील खायला।
कोशिटा होतील भाजीला आठिळ्या होतील टाकून द्यायला पिकलेला फणस आपण फोडू या ।

आई माझी बेबी दुखते चटणी भाकरी खाया मागते ।।
आई माझ्या पोळीवर तुंफ वाढ । इथे वाढ तिथे वाढ ।।
तुझ्या बापाचे काय गेले । आई माझ्या पोळीवर तुफ वाढ ।।

सूत्रधार - बा विदूषका तुझा आवाज खरोखर सुरेख आहे. परंतु तु जे गाणं म्हणालास ते अगदी उलट म्हणालास तेव्हा मी तुला हे गाणं कसं म्हणावं, ते म्हणून दाखवतो
पिकलेला फणस आपण फोडू या । गरे होतील खायाला ।
चारखंडे होतील म्हशीला । कोशिटा होतील टाकून द्यायला ।
आठिळ्या होतील भाजीला । पिकलेला फणस आपण फोडू या ।

विदूषक - गाणं खरंच की हो. चांगले आहे. मी हे गाणं अगदी उलट अर्थी म्हणालो होतो.

सूत्रधार - बा विदूषका, आता आपण संगीत नाटकच करू या तेव्हा तू स्वर्गात जाऊन गोविंद-गोपाळांची जोडी घेऊन ये.

विदूषक - सूत्रधार हो. स्वर्गात जायचं म्हणता खरं पण स्वर्गात गेलेला माणूस परत आलेला कधी पाहिला आहे का आपण?

सूत्रधार - बा विदूषका, तुला मी काम सांगितले आहे. हे तूच स्वर्गात जाऊन परत येशील म्हणूनच तुला सांगितले.

विदूषक - बरं येऊ का? बरं जाऊ का. बर येतो (दोन तीन वेळा तेच तेच विचारतो व जातो)

**(गोविंद - गोपाळ येतात)**

गाणं - हरे रमणा गोविंदा । केशव माधव गो गोविंदा ।
पार्वती रमणा गोविंदा । दशावतारा गोविंदा । (वंदन करतात)

सूत्रधार - बाळ विदूषका स्वर्गात जाऊन गोविंद - गोपाळ आणलेस तसेच आता इंद्रलोकात जाऊन या लोकांचं मनोरंजन करण्यासाठी रंभा घेऊन ये.

विदूषक - सूत्रधारहो, स्वर्गातुन मी परत आलो खरा पण आता माझे पाय दुखतायत तेव्हा आधी माझे पाय चेपा ( आणि नंतर रंभा आणतो.) (सूत्रधार पाय चेपतात) रंभा येतात.

गाणं - चाले छुम छुम छुम । पाणी भर गेले पाणी भर गेले ।।धृ।।
(दोन वेळा म्हणणे )

रंभा - आम्ही इंद्रलोकात नृत्य गायन करीत असता आपले आमंत्रण कशासाठी?

सूत्रधार - हे रंभे, हे चतुरे, आज येथील लोकांचे मनोरंजन करण्यासाठी आपणास बोलावले आहे. तेव्हा आपण एखादी लावणी किंवा गाणे सादर करावे.

रंभा - ठीक आहे. (लावणी म्हणतात)
दुलडी गळा पाचलडी चोळीवर खंडी । चमके ऐना, ग ऐना , ऐना कोण्या सावकाराची मैना ।।धृ।।
नेसली पीतांबर भरजरी । जरी ग जरतारी , लाल साडी ग साडी चालताना पदर झाडी ।।१।।
आम्ही काशीचे ब्राह्मण दे ग दान ।
घडेल पुण्य ग पुण्य पुण्य पुण्य पुण्य रंगू तुला पावेल श्री भगवान ।।२।।
दरियासी आले तुफान हवा ग चला पाहू ।
अंबे बनी ग बनी बनी बनी रंगू तुला पावेल श्री भगवान ।।३।।

सूत्रधार - वा सुरेख, फारच छान गाणं म्हणालात अजून एखादं गाणं म्हणावं

गाणं - पुरुष पहा नादी कसे असती । नादी कसे असती । पुरुष हे नादी कसे असती ।।धृ।।
गृह धंद्याची वाट नसे मुळी । भटकत हे फिरती । पुरुष हे नादी कसे असती ।।१।।
या अबलांचे अधिकाराने । व्यर्थची हे छळती । पुरुष हे नादी कसे असती ।।२।।
आजवरी हे नाटकी नटले । हौस पुन्हा धरती । पुरुष हे नादी कसे असती ।।३।।

विदूषक - प्रेक्षकहो आता पुढील कार्यक्रम पाहण्यास विसरू नका आणि झोपूही नका.
(असे सांगून सूत्रधार व विदूषक जातात.)
(पडदा पडतो.)

## अंक दुसरा

मत्स्यावतार

(पडदा वर जातो)

कृष्ण गोविंद गोविंद । गोपाळ राधे ...। कृष्ण गोविंद गोविंद ।।धृ।।

ब्रह्मदेव - (आचमन करून ध्यानस्थ बसलेला आहे)

शंकासुर - दशावतारा नारायणा । (तीन वेळा म्हणावे)

चूप चूप चूप - शंकासुर देव नमो नमो (तीन वेळा)

शंकासुर - (स्नान, आचमन, गंध, भस्म, अर्घे, पळी भांडे नेऊन ब्रह्मदेवाजवळ नेऊन ठेवतो)

ब्रह्मदेवहो स्तब्ध का बसलात?

ब्रह्मदेव - सांगतो ऐकून घ्या.

चारी वेद पुराण शास्त्र अवघे । शंकासुरे हारिले ।।
पीडा देउनी धेनु ब्राम्हण । सुरा पाताळी भू बैसिले ।।
ऐ, दानव मातला त्रिभुवनी । त्याते नसे मरिता ।।
इंद्रा-दिक देव देखुनी भये । होती क्षणी कंपिता ।।
यास्तव बैसलो स्तब्ध जरी । आता त्रैलोक्यनाथा श्रीहरी ।।
त्याचा वास क्षीरसागरी । सर्व मिळूनी जाऊ तेथे ।।

शंकासुर नावाचा दैत्य उन्मत्त होऊन चार वेद सहा शास्त्रे, अठरा पुराणे हिरावून नेली एवढ्यासाठी आपण श्रीहरीचे स्तवन करू या (श्रीहरी प्रगट होतात. ब्रह्मदेव व श्रीहरी एकमेकांस भेटतात)

गाणं -

नारायण नारायण नारायण नारायण जय गोविंद हरे ।।धृ।।

श्रीहरी - ब्रह्मदेवहो श्रीहरीचे स्तवन कोणत्या कारणास्तव केलेत?

ब्रह्मदेव - देवाधिदेवा, शंकासुर नामे दैत्य उन्मत्त होऊन चार वेद, सहा शस्त्रे, अठरा पुराणे हिरावून नेली. तेवढ्यासाठी आपले स्तवन केले.

श्रीहरी - ।।ओवी ।।

आम्ही मत्स्यरूप धरितो । शंकासुर नामे दैत्यास वधितो ।
तुमचे वेद तुम्हास देतो । निर्भय असावे स्वस्थाने ।।

तुम्ही स्वस्थ असा आम्ही स्वस्थानी गमन करतो
पद
नारायण नारायण नारायण नारायण ।

मनुराजा - (अर्घे देतो. आचमन करून ) तीन वेळा अर्घे
आकाशवाणी होते
हे मनुराज तुझे हस्ताचे ठायी जो मत्स्य उत्पन्न झाला तो फार उपयोगी आहे. तो नीट जपून ठेवा. ऐकलीत ना आकाशवाणी बाणगंगेत सोडून
दशावतारा नारायणा (तीन वेळा म्हणणे)

शंकासुर - शंकासुर देव नमो नमो । (तीन वेळा म्हणणे)

नाईक हो मोठा मोठा मोज केला, ऐका सातासमुद्राच्या पलाटिला एका जंबु बेटामध्ये मोठा मौज केला.

ऐका पलंग आणिला त्याच्यावर गाद्या गिर्द्या टाकल्या ऐक नायकीण आणली आणि मोठा मोठा मौज केला.

ह्या पायात हा पाय ह्या पायात हा पाय ह्या हातात हा हात त्या हातात हा हात
मोठा मोठा मौज केला.
(लढाई होते ) पडदा पडतो.

## अंक तिसरा
## कूर्मावतार

प्रथम दैत्य नाचत प्रवेश करातात. बळी दैत्य, सेवक

सेवक - बली दैत्य महाराज, आपला बांधव वंदन करीत आहे. (प्रत्येक दैत्य क्रमाक्रमाने वंदन करतात)

बळी दैत्य- संपूर्ण दैत्य कल्याण बसावं.
(श्रीकृष्ण गोविंद गोविंद पद चालू असता दैत्य येतात)

बळी दैत्य - संपूर्ण दैत्य हो, देव आपणाकडे कपटाने, क्रूरतेने सख्य करण्यासाठी येत आहेत. तरी आपण सावधगिरीने असावे. (सर्व देव येतात.)

ब्रह्मदेव - संपूर्ण दैत्य हो, तुम्हा आम्हामध्ये वैर नसावे यासाठी संपूर्ण दैत्य हो, आज आपण समुद्र मंथन करू या ॐ

बळी दैत्य - (सर्व दैत्य ठीक आहे ) ब्रह्मदेव हो समुद्र मंथन करायचं म्हणता खरं यःकश्चित ताक करण्याकरता रवि आणि रस्सी लागते, त्याची व्यवस्था काय केली आहे? तेव्हा आपणच व्यवस्था करावी.

ब्रह्मदेव - संपूर्ण दैत्य हो, आपण वीर आहात, शूर आहात पराक्रमी आहात तेव्हा आपणच वासुकी सर्प आणि मंदराजाल पर्वत घेऊन व्यवस्था करावी.

बळी दैत्य - बांधवा, वासुकी सर्प आणि हिमालय पर्वत घेऊन येणे

बांधव - ठीक आहे (नाचत हिमालय पर्वत वा वासुकी सर्प आणायला जातो व घेऊन येतो )

ब्रह्मदेव - संपूर्ण दैत्य हो अधोमुखाकडे आम्ही लागणार.

दैत्य बांधव - आम्ही लागणार आम्ही लागणार.

ब्रह्मदेव - ठीक आहे (जागांची अदलाबदल करतात) पद चालू होते.

पद - धावे पावे करूणा हारी रे ।
निर्विर करी रे ।
देवाजी तुम्ही ताराया या हरी रे । (२ वेळा म्हणणे)

ओवी - वासुकी सर्प आणिला । तेणे भू आधार तुटला ।।
सर्व भूगोल डोलू लागला । सत्वर स्मरा श्रीहरी ते ।।

ब्रह्मदेव - संपूर्ण दैत्य हो समुद्र मंथन करते समयी भूगोल डोलू लागला एवढ्यासाठी आपण श्रीहरीचे स्तवन करू या.

पद - नारायण नारायण नारायण नारायण (असे दोन वेळ) आधी भेटतात.

श्रीहरी - ब्रह्मदेव हो श्रीहरीचे स्तवन कोणत्या कारणास्तव केले?

ब्रह्मदेव - (श्रीहरीस भेटतात) देवाधि देव समुद्र मंथन करता समयी संपूर्ण भूगोल डोलू लागला पृथ्वी गदगदू लागली एवढ्यासाठी आपले स्तवन केला आहे.

श्रीहरी - सांगतो ऐकून घ्या.
आम्ही कूर्म रूप घेउनी । पृष्ठभागी घेतो अवनी ।
आता तुम्ही सावध मनी । मंथन करा जलदीचे

श्रीहरी - आम्ही कूर्म रूप घेतो (धारण करतो) पृष्ठभागी अवनी घेतो. तुम्ही स्वस्थ असा आम्ही स्वस्थानी गमन करतो.
नारायण नारायण नारायण नारायण । धावे पावे करूणा हरी रे । (दोन वेळा)

ब्रह्मदेव - संपूर्ण दैत्य हो समुद्रमंथन करते समयी विष प्राप्त झाले एवढ्यासाठी आपण श्रीहरीचे स्तवन करू या नारायण नारायण नारायण नारायण (श्रीहरी प्रगट)

श्रीहरी- संपूर्ण देव दैत्य हे श्रीहरीचे स्तवन कोणत्या कारणास्तव केले ?

ब्रह्मदेव- (जाऊन भेटतो श्रीहरीस) देवाधि देवा, समुद्र मंथन करते समयी विष प्राप्त झाले.

श्रीहरी- आपण शंकराचे स्तवन करा आपला कार्यभाग होईल. तुम्ही स्वस्थ असा....
नारायण नारायण नारायण नारायण । (दोन वेळा)

पद- भागीरथी मस्तकी वाहे जयाच्या ।
वामांगी गिरिजा शोभे तयांच्या ।
स्मशानवासी वृषभध्वजा हो ।
येउनी गरळ भक्षी विषचार बाहो ।
(शंकर येतात)

गाणं - तुझे चरण कमल मज पाहू दे ।
तुझे चरण कमल मज पाहू दे ।
हे पार्वती वरा रे । तुझे चरण कमल मज पाहू दे ।।धृ।।
आदि नारायण आत्मस्वरूपी ।
अटळ अचल सुख पाहू दे ।
हे पार्वती वरा रे । तुझे चरण कमल मज पाहू दे ।।१।।

शंकर - आहा रे शिव सांब भोळा ।
हाती भस्माचा गोळा ।
गळ्यामध्ये रुद्र माळा ।
तृतीय नेत्र कपाळा ।
त्यातुनी निघती अग्निच्या ज्वाळा ।
ऐसा हा शिव सांब भोळा ।
त्याचा स्तव कीमार्थ केला ।

ब्रह्मदेव - हे पशुपते गंगाधरा समुद्र मंथन करते समयी विष प्राप्त झाले. एवढ्यासाठीच आपले स्तवन केले आहे.

शंकर - तो भाग आमचाच आहे. आमचा आम्ही घेतो. (विषाचा पेला आणून देतो. पितात.)

ओवी - गरळ भक्षिता निलकंठ । राहिले जे तुषार अवशिष्ट ।
तो भाग वासुकीचा स्पष्ट । द्यावा तया भक्षावया ।
पावना वामना यामना
धावे पावे करूणा हरी रे ..... (मंथन चालू होते)
धावे पावे करणा हरी रे ।

ब्रह्मदेव - संपूर्ण देव दैत्य हो, समुद्र मंथन करते समयी चौदा रत्ने प्राप्त झाली. तेवढ्यासाठी आपण श्रीहरीचे स्तवन करू या.
नारायण नारायण नारायण नारायण । (दोन वेळा)

श्रीहरी - संपूर्ण देव दैत्य हो. श्रीहरीचे स्तवन कोणत्या कारणास्तव?

ब्रह्मदेव - (श्रीहरीस भेटतात) देवाधि देवा समुद्र मंथन करते समयी चौदा रत्ने प्राप्त झाली. देव दैत्यांमध्ये कलह उत्पन्न झाला एवढ्यासाठी आपले स्तवन केले.

श्रीहरी - सांगतो ऐकून घ्या,

ओवी - लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सूरा ।
धन्वंतरी चंद्रमा गाव ऽऽ का ।
मधुगा सुरेश्वर गजो ।
रंभादी देवांगना ।
अश्वसप्तमुखो विशंहरिधनू ।
शंखोमृतं चांबु दे ।
रत्नानिह चर्तुदश प्रतिदिनम ।

कुर्यात सदा मंगलम ।

लक्ष्मी कौस्तुभ श्रीविष्णुस द्‌यावा

पारिजातक सत्यभामेस द्‌यावा । धन्वतरी श्रीविष्णूस द्‌यावी ।

रंभा इंद्रास द्‌यावी । सप्तमुखी अश्व श्रीसूर्या नारायणास द्‌यावा ।

शंख श्रीविष्णुस द्‌यावा । सुरा दैत्यास द्‌यावी ।

कामधेनु वशिष्ठासी द्‌यावी या प्रकारे चौदा रत्न वाटून घ्यावी.

तुम्ही स्वस्थ असा आम्ही स्वस्थानी गमन करतो.

नारायण नारायण नारायण नारायण

धावे पावे करूणा हरी रे ।

ब्रह्मदेव - समुद्र मंथन करते समयी अमृत प्राप्त झाले. एवढ्‌यासाठी आपण श्रीहरीचे स्तवन करू या.

नारायण नारायण नारायण नारायण । (श्रीहरी प्रकट होतो)

श्रीहरी - संपूर्ण देव दैत्य हो, या मार्गाने जी कोणी स्त्री जाईल तिचा कर पवित्र मानून अमृत वाटून घ्यावे

नारायण नारायण नारायण नारायण

पद - चाले छुम, छुम छुम । पाणी भरा गेले ।

पाणी भरा गेले । चाले छुम छुम छुम ।

पद- उभे पक्तीने बसा देव हो । अमृत वाढीते नीट बसा बोले जगदंबा म्हाळसा ।

(असे म्हणून देव बसतात व नंतर राक्षस बसतात)

राहू प्रथम बसून क्रमाक्रमाने प्रथम देव बलकाक व अमृत वाटले जाते नंतर पुन्हा प्रथम राहू बसून क्रमाक्रमाने दैत्य बसतात व अमृत वाटून होते.

पद - देव पंक्तीस राहू बैसोनी । वेगे अमृत पात करोनी दैत्य पंक्तीस बैसोनी । दंड ठोकू लागला ।

राहू - दैत्य हो पाहता काय. या देवांनी आपणाकडे अमृत घेऊन तुम्हास विष दिले पाहता काय.

(देव दैत्याचे युद्ध होते)

(पडदा पडतो)

## **अंक चौथा**

।। वराह अवतार ।।

(पडदा वर जातो) कश्यप ऋषी आसनस्थ आहेत. आचमन करून बसला आहे.

कश्यप - अग्रश्च चतुरो वेदा । पृष्ठश्च शंर धनुः ।।
इदं ब्रह्म इदं क्षात्रं । शापादपि शरादपि ।।

श्लोक कलंकाच्या भांड्या कनक प्रतिमा कोण चढवी ।
रविच्या रश्मीचे कोण नर तो तेज लपवी ।।
कृतांताच्या दूता गमन समयी कोण फिरवी ।
विधात्याची रेषा कोण नर तो भोग चुकवी ।।

उत्तर - कलंकावाचुनी कनक प्रतिमा कांती न चले ।
हेमंता संयोगे क्षणभरी तरी भास्कर बुडे ।
कृतांताच्या दूता गमन समयी साधु फिरवी ।।
विधात्याची रेषा गुरुवर कृपेविण नुरवी ।।

अदिती - महाराज मी कामातुर आहे. (3 वेळा म्हणणे)

कश्यप - कामातुर आहे. कामातुर आहे. काय भानगड आहे? (कश्यप ऋषींना घेऊन जाते )

कश्यप- ( पुन्हा आसनस्थ बसतात व स्नानसंध्या आचमन वगैरे करतात)(नारद प्रवेश करतो)

पद नारायण नारायण

गाणे नारायण नाम स्मरा रे । भव सागर पार करा रे ।
थोर थोरासी लावुनी कळी । वाजवी अंतराळी टाळी ।
नाम घेता प्रातः काळी । सकळ दोष हरतील ।
नारायण नाम स्मरा रे । भव सागर पार करा रे ।
पाषभोग मानवा कारणे । काय अस्ता समयी ।
ऋतु मागणे हे । सर्व देवही मागती राया । या स्थळी मी गमतो बघाया ।।

नारद - सांब सांबाची पार्वती, विष्णु विष्णुची लक्ष्मी ब्रह्मदेव ब्रह्मदेवाची सावित्री एवढे हे करीत असता या थोर कश्यप मुनींना हे अनुचित करणे बरे नाही. पुढे फार कठीण आहे. नारायण नारायण

पद - मम नयनी राम रसछाया । मुखी रामनाम मधुमाया ।।
मम नयनी राम रस छाया । पूजेचा उपचार सोडीला ।।
जप तप नेणे मी बननीळा । माझा भोळा भाव जिव्हाळा ।
किती वाट बघू यदुराया ।।धृ।।
ध्रुव प्रल्हादे तुज आळविता । धावत येसी तू भगवंता ।
दिन वत्सला सदया ।। मम नयनी राम रस छाया ।

अदिती - महाराज मी अपराधी आहे अपराधी आहे.

कश्यप - जा शिंदडिंचे, तुला दोन महाचांडाळ पुत्र होतील. एक गो ब्राह्मणास पीडा देतील व पृथ्वी रसातळास नेईल ( असा शाप देतात व अदिती निघून जाते )

(दोन दैत्य हिरण्याक्ष व हिरण्यकशिपू प्रकट होतात)

हिरण्याक्ष - बांधवा, तू गो ब्राह्मणास पीडा दे मी पृथ्वी रसातळास नेतो. (हिरण्यकशिपू कश्यप मुनींवर तलवार उगारुन घेऊन जातो)

पद- दशावतारा नारायणा । दशावतारा नारयणा । (वराह प्रकट होतो)

हिरण्याक्ष - चोरा, तू कोण आहेस रे?

वराह - चोरा, तू कोण आहेस रे?

हिरण्याक्ष - मी हिरण्याक्ष आहे.

वराह - मी वराह आहे.

हिरण्याक्ष - तुझ्या दाढेवर काय आहे रे?

वराह- माझ्या दाढेवर पृथ्वी आहे.

हिरण्याक्ष - ती खाली ठेव. ती माझी आहे.

वराह - ठेवत नाही ती माझी आहे.

हिरण्याक्ष - युद्धास तयार हो.

वराह - ठीक आहे.

(असे म्हणून दोघांचे युद्ध होते हिरण्याक्ष पडतो व पडदा पडतो )

**अंक समाप्त**

## अंक पाचवा

## नरसिंह अवतार

पडदा वर जातो. कचेरीला सुरुवात होते

(प्रथम सेनापती नाचत येतो व नंतर प्रधान नाचत येतो आणि नंतर हिरण्यकशिपु नाचत येतो)

प्रधान - महाराज आपला कुंभप्रधान वंदन करीत आहे.

हिरण्यकशिपु- कुंभ प्रधान कल्याण बसावं.

सेनापती - महाराज, आपला सेनापती वंदन करीत आहे.

हिरण्यकशिपु- सेनाधिपते, कल्याण बसावं.

कुंभप्रधान आपल्या संपूर्ण राज्याचा बंदोबस्त कोणत्या प्रकारे ठेवला आहे, बोला!

प्रधान - महाराज, आपल्या संपूर्ण राज्याचा बंदोबस्त आपल्या हुकुमाप्रमाणे फार उत्तम प्रकारचा ठेवला आहे. सरकार.

हिरण्यकशिपु -शाब्बास प्रधान, शाब्बास!

कुंभप्रधान अंग, वंग, कलिंग, काश्मिर, कर्नाटक, द्रविड, गुर्जर आदि कडून संपूर्ण देशाचे राजे दर संवत्सराचे संवत्सरास कर भार देत असतात की नाही बोल.

प्रधान - महाराज अगं, वंग, कलिंग, काश्मीर, कर्नाटक, द्रविड, गुर्जर आदिकडून संपूर्ण देशाचे राजे दर संवत्सराचे संवत्सरास कर भार देत असतात सरकार.

हिरण्यकशिपू- जर करता न देतील तर.

प्रधान - जर करता न देतील तर. त्यांना राज्यावरून पद्च्युत करून त्यांच्या मुला बाळास राज्याभिषेक करून त्यांच्याकडून कर भार घेत असतो, सरकार!

हिरण्यकशिपु - शाब्बास, प्रधान शाब्बास.
सेनाधिपते, आपल्या राज्यावर जर परशत्रु प्राप्त झाला तर त्याची व्यवस्था काय केली आहे बोला.

सेनापती - महाराज, आपला पराक्रम असा आहे की ह्या पृथ्वीतलाचे ठायी एक लत्ता प्रहार केला असता ही पृथ्वी शेषाच्या मस्तकापर्यंत कंपायमान होत असते सरकार तर परशत्रु म्हणजे बिशाद काय?

हिरण्यकशिपु- शाब्बास सेनाधिपते शाब्बास! प्रधान नित्याने गोहत्या, बाल हत्या, ब्रह्म हत्या किती करत असतोस, बोल.

प्रधान - महाराज नित्यशा गोहत्या, बालहत्या, ब्रह्महत्या आपल्या हुकुमाप्रमाणे ३७९० करीत असतो सरकार.

हिरण्यकशिपु- शाब्बास प्रधान शाब्बास. सेनाधिपते, शास्त्रशाळा, अस्त्रशाळा यांचा बंदोबस्त कशा प्रकारे केला आहे, बोल.

सेनापती- महाराज शस्त्रशाळा, अस्त्रशाळा यांचा बंदोबस्त आपल्या हुकुमाप्रमाणे उत्तम ठेवला आहे. सरकार.

हिरण्यकशिपु- प्रधान अश्वशाळा, गजशाळा, मृगशाळा, नृत्यशाळा यांचा बंदोबस्त कोणत्या प्रकारे ठेवला आहेस बोल.

प्रधान - महाराज अश्वशाळा, गजशाळा, मृगशाळा, नृत्यशाळा यांचा बंदोबस्त आपल्या हुकुमाप्रमाणे फार उत्तम प्रकारे ठेवला आहे सरकार!

हिरण्यकशिपु- शाब्बास, प्रधाना शाब्बास! प्रधान आतल, वितल, सुतल, तलातल इत्यादी सत्पपाताळी मी माझ्या बाहुबलाने योगेकरून पादाक्रांत करून टाकले आहे, परंतु प्रधान माझा भाऊ हिरण्याक्ष मोठ्या हर्षाने व शूरत्वाने पृथ्वीरसातळात आणण्यासाठी गेला आहे त्याचा काही समाचार कळत नाही.

प्रधान - महाराज, दूत येण्याची वेळ झालेली आहे.

दूत- महाराज, आपले बंधू पराजित पावले.

हिरण्यकशिपु- (गुडघे टेकून हात जोडून म्हणतो ) हरे हरे शंकरा । पीनाक पाणी डमरू धरा ।
हे भोलानाथ शंकरा आज ह्या दासावर अशी अवकृपा का बरं केली? हरे हरे शंकरा.

प्रधान - महाराज, उठावं महाराज. शोक करण्याचे काही कारण नाही.

हिरण्यकशिपु- प्रधान, म्हणतोस ही गोष्ट खरी आहे वीराचा धर्म असा आहे की मारावं अथवा मरावं युद्ध करून कीर्ती संपादन करावी अरे त्या दृष्टाने पाताळात गमन केले काय. काही चिंता नाही.

प्रधान, आणखी सांगतो ऐक. माझा पराक्रम असा आहे की. मारीन पन्नतकू फोडीन शेष टाळू भूगोल हा उलाथिता मज नसे वेळू. अरे नर करता पन्नक मारीन तर शेषाची टाळू फोडून टाकीन तसेच हा भूगोल पालथा घालण्यास मला एक क्षणही लागणार नाही. प्रधान, आणखी सांगतो ऐक घालीन पृथ्वी पालथी, स्वर्ग पाडीन खालती. गेला असेल कुठे दुष्ट चांडाल तो. त्या दुष्टाने पाताळामधे गमन केले काय काही चिंता नाही. प्रधान, धनेन कांता कपटेन शत्रु, धनावाचून स्त्री वश होत नाही आणि कपटावाचून शत्रु सापडत नाही. म्हणून म्हणतो अरण्यात जाऊन महपिता ब्रह्मदेव यांची तपश्चर्या करून अमरत्व प्राप्त करून घेतो आणि मगच त्या दुष्टाचा सूड घेतो प्रधाना - राज्य कारभार नीट ठेव मी येतो.

प्रधान - सेनाधिपते, तू सैन्याचा बंदोबस्त ठेव व मी राज्य कारभार सांभाळतो.

सेनापती - (ठीक आहे) (दोघे जातात) महाकालाचे दृष्य

कयादू- कोण आहे गं तिकडे। दासी अग शेवंती अग मालती.

दासी - बाईसाहेब, महाराज आले.

कायदू- महाराज, नमस्कार करते.

हिरण्यकशिपु- स्त्रीये, कल्याण बैस.

कयादू - महाराज, आपण ज्या वेळी महालात येता त्या वेळी आपले मुखकमल किती आनंदी असतं मग आजच असे म्लान का बरे?

हिरण्यकशिपु - प्रिये, राज्यात सुख दुःख अनेक असतात.

कयादू- मग ती मला नाही का सांगायची? मग ही पहा मी निघालेच.

हिरण्यकशिपु- स्त्रीये, अशी रागवून जाऊ नकोस. ये बैस. प्रिये माझा वाम हस्त गळून पडला ह्या हाताने शस्त्र धारण करवत नाही आणि मुखाने बोलवत नाही काय सांगू प्रिये, माझा भाऊ हिरण्याक्ष मोठ्या हर्षाने व शूरत्वाने पृथ्वी रसातलाला नेण्याकरता गेला होता. तेथे त्या दृष्टीने त्याचा सूड घेतला.

कयादू- हरे हरे शंकरा .

हिरण्यकशिपु- प्रिये, शोक आवर, झाली गोष्ट होऊन गेली. आता त्याचा शोक करून काही उपयोग नाही. एवढ्याकरता माझा असा विचार आहे की अरण्यात जाऊन महपिता ब्रह्मदेव यांची तपश्चर्या करून त्याच्याकडून अमरत्व प्राप्त करून घेतो आणि मगच त्या दुष्टाचा सूड घेतो. एवढ्याकरता मला अरण्यात जाण्याची आज्ञा द्यावी.

कयादू - महाराज, भाऊजींचा पराक्रम म्हणजे हलका सलका का होता? त्यांची ह्या दृष्टाने ही गती केली मग आपले काय होईल? म्हणून म्हणते अरण्यात जाण्याच्या भरीस पडू नये.

हिरण्यकशिपु- प्रिये, सांगतो ऐक

तात मिलै पुनि मात मिलै सुन भ्रात मिलै युवती सुखदायी ।

राज मिलै गजवाजि मिलै सब साजि मिलै मन वांछित पाई ।।
लोक मिलै सुरलोक मिलै विधिलोक मिलै वैकुंठही जाई ।
सुंदर औरतही मिलै सबही सुख, संत समागम दुर्लभ भाई ।।

प्रिये, राज्य मिळेल, मनासारखे सुपुत्र मिळतील, आप्त मिळतील, तिन्ही लोक म्हणजे सत्य लोक, मृत्युलोक आणि कैलास लोकही मिळतील आणि प्रिये, प्रयत्न केला असता तुझ्यासारखी सुंदर भार्या मिळेल पण साधु समागम मिळणे फार दुर्लभ आहे आणि तो साधण्याकरता मला अरण्यात जाण्याची अनुमती दे.

कयादू- आपण अरण्यात जाणार म्हणजे आपल्याला खूप वर्ष लागतील म्हणून मला भीती वाटते.

हिरण्यकशिपु- प्रिये, तुला मीच सांगितले पाहिजे असे नाही कारण तूही ज्ञानी आहेस, परंतु सांगतो ऐक.

जल जा न लक्षंतु । दशलक्षंतु पक्षिणाः ।
त्रिशंत लक्ष गज अश्वाधी स्थावरणांच विंशती ।
क्रिमीयो रुद्र संख्यात चतुर लक्षंतु मानवा ।
एता चतुर विंवशस्तु दुखयो यवयो नमः ।

प्रिये जलात वास करणा-या प्राण्यांमध्ये नऊ लक्ष प्रकारचे भेद आहेत. पक्ष्यांमध्ये दहा लक्षांचा भेद आहे. हत्ती, घोडे वगैरे प्राण्यांमधे तीस लक्ष प्रकारचे भेद आहेत. स्थावर झाडे वगैरे वनस्पतींमध्ये वीस लक्ष प्रकारचे भेद आहेत. कृमी किटकांमध्ये अकरा लक्ष प्रकारचे भेद आहेत आणि मानवामध्ये चार लक्ष प्रकारचे भेद आहेत. अशा दुःखदायक चौ-यांशी योनी भोगाव्यात तेव्हा हा मानव देह प्राप्त होतो. त्याचा उपयोग नाना प्रकारचे उपभोग घेण्यासाठी करून चालणार नाही. प्रत्येक मानवाने आपणाला मुक्ती मिळण्याकरता ज्ञान मिळविले पाहिजे. म्हणून म्हणतो मला अरण्यात जाण्यास संमती दे.

कयादू - ज्ञान आपल्याला इथेही मिळवता येईल. त्याच्यासाठी अरण्यात जाण्यास भरीस पडू नये.

हिरण्यकशिपू- प्रिये, तू म्हणतेस त्याप्रमाणे मीही भक्ती मार्ग स्वीकारला आहे॰ पण तू म्हणतेस त्याप्रमाणे ही भक्ती नसून ही विरोध भक्ती आहे. भक्तीचे एकूण नऊ प्रकार आहेत. त्यांपैकी विरोध भक्ती फार कठीण आहे; परंतु हीच भक्ती मी करीत आहे याचे कारण काय ते मी तुला सांगतो. प्रिये, आम्ही दोघे बंधु, पूर्वी शेषशाही भगवानांचे द्वारी द्वारपाल होते त्यावेळी एकदा नारद मुनी व कश्यप मुनी प्रभुच्या दर्शनास आले. त्यावेळी आम्ही त्यांना प्रभुच्या दर्शनास मज्जाव केला. त्यावेळी ते दोघे क्रोधायमान झाले आणि त्यांनी आम्हांस शाप दिला. दुष्ट चांडाल हो ज्याअर्थी तुम्ही आम्हांस प्रभुच्या दर्शनास मज्जाव करता त्याअर्थी तुम्ही दैत्य कुळात जन्म घ्याल तेव्हा आम्ही त्यांना शरण गेलो आणि आम्ही त्यास उःशाप मागितला तेव्हा ते म्हणाले जर तुम्ही विरोध भक्ती कराल तर तीन जन्मांनी मुक्त व्हाल नाहीतर सप्तजन्म भोगावे लागतील. आणि त्यामुळेच आम्ही विरोध भक्ती करत आहोत म्हणून म्हणतो स्त्रिये मला अरण्यात जाण्याची संमती दे.

कयादू - महाराज आपण शूर आहात, वीर आहात, ज्ञानी आहात. आपणांस जे योग्य वाटेल ते करावे. प्राणनाथ नमस्कार करते. (हिरण्यकशिपू अरण्यात जातो)

हिरण्यकशिपू- सेवक, या ठिकाणी तपश्चर्येला उत्तम छाया व उत्तम उदक दाखव ( थोडावेळ इकडे तिकडे पाहून)

सेवक - उत्तम उदक व छाया या ठिकाणी आहे महाराज.

हिरण्यकशिपू- सेवक मी या ठिकाणी तपश्चर्येला बसत आहे तेव्हा नीट लक्ष ठेव आणि माझ्या तपाचा जो भंग करील त्याचे एक घाव दोन तुकडे केले जातील. हे घे शस्त्र (महपिता ब्रह्मदेव हो हा दास आपली एकनिष्ठेने सेवा करत आहे. दासास त्वरित दर्शन द्यावे. ) (नारायण, नारायण, नारायण म्हणतात आणि तपाचा भंग होतो) (तलवार घेऊन सेवकावर धावून जातो.)

हिरण्यकशिपू- सेवक, पुन्हा हे शस्त्र घे माझ्या तपाचा जो भंग करील त्याचे एक घाव दोन तुकडे करीन. महपिता ब्रह्मदेव हो मी तुमची एकनिष्ठेने सेवा करीत आहे या दासास त्वरित दर्शन द्यावे.

ब्रह्मदेव - दैत्य बालका, तू ज्याची एकनिष्ठेने सेवा करित आहे. तो तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला पाहिजे ते वर मागून घे.

हिरण्यकशिपू- महपिता ब्रह्मदेव हो हा दास आपणास वंदन करीत आहे. ह्या हिरण्यकशिपूला अमरत्व असावे.

ब्रह्मदेव - हा वेड्या, आम्हा देवांनाही अमरत्व नाही तर तुला काय देणार, अन्य वर मागून घे.

हिरण्यकशिपू- अन्य वर देण्यास तयार आहात? या हिरण्यकशिपूला आकाशी मरण नसावे, पाताळी मरण नसावे, स्त्रीच्या हातून नसावे, पुरुषाच्या हातून नसावे, शस्त्राने नसावे, अस्त्राने नसावे, सजीवाकडून नसावे, निर्जीवाकडून नसावे. दिवसा नसावे, रात्री नसावं घरात नसावे, बाहेर नसावे या या प्रकारे वर देण्यास तयार आहात?

ब्रह्मदेव - तथास्तुॐ

हिरण्यकशिपू- वराची प्रचिती पाहिलीच पाहिजे (असे म्हणून तलवार उगारून ब्रह्मदेवांवर आक्रमण करतो)

(हिरण्यकशिपू तपश्चर्या करून राजमहालात येतो) (सेनापती प्रधान वंदन करतात दरबार सुरू होतो)

हिरण्यकशिपू- प्रधान, मी ज्यावेळी अरण्यात होतो त्यावेळी त्या दुष्ट भगिद्राने आपणावर स्वारी केली होती त्यावेळी आपण झोपला होतात की काय?

प्रधान - महाराज, आपण त्यावेळी अरण्यात होतात तेव्हा त्या दुष्ट भगिद्राने आपणावर स्वारी केली होती तेव्हा मीही त्यांच्यावर स्वारी केली परंतु नारद मुनींनी मध्यस्थी करून आपली संतती व संपत्ती वाचवली.

हिरण्यकशिपू- धन्य धन्य नारद मुनी केवढे हे थोर उपकार केले आहे.

प्रधान - महाराज, आपण ज्यावेळी अरण्यात गेला होतात त्यावेळी जे वर मागून घेतले ते ह्या दासास कथन करावेत.

हिरण्यकशिपू - ह्या हिरण्यकशिपूला आकाशी मरण नसावे, पाताळी मरण नसावे, स्त्रीच्या हातून नसावे, पुरुषाच्या हातून नसावे, शस्त्राने नसावे, अस्त्राने नसावे, सजीवाकडून नसावे, निर्जीवाकडून

नसावे. दिवसा नसावे, रात्री नसावं घरात नसावे, बाहेर नसावे (प्रत्येक वेळी प्रधान , सेनापती क्रमाक्रमाने ओ हा म्हणतात)

हिरण्यकशिपू- प्रधान, मी ज्यावेळी अरण्यात गेलो होतो त्यावेळी मी स्त्री कयादु गरोदर होती तेव्हा मंदिरातील वर्तमान वेळोवेळी कळवत जा.

प्रधान - ठीक आहे महाराज (प्रधान सेनापती वंदन करून निघून जातात)

सेवक - महाराज, नवमास पूर्ण झाले.

हिरण्यकशिपू- प्रधान, गुरुजीस पाचारण करा (गुरुजी व त्यांचे सहकारी येतात)

गुरुजी- राज, मी स्नान संध्या करतेवेळी आपले आमंत्रण कशासाठी?

हिरण्यकशिपू- गुरु महाराज, कयादूला नवमास पूर्ण झाले. कायदूला पुत्र होईल की कन्या?

गुरुजी - ठीक आहे. ना-या घरी जाऊन पंचांग व चाळीशी घेऊन ये (ना-या निघून जातो व पंचांग घेऊन येतो)

गुरुजी - ना-या आज तिथी कोणती, वार कोणता, नक्षत्र कोणते, प्रहर कोणता (असे प्रश्न गुरुजी ना-यास क्रमाक्रमाने विचारतात.) राजा आत्ताच्या वेळेवरून आपणास पुत्रलाभ होईल.

हिरण्यकशिपू- गुरुजी, दैत्यकुळास योग्य आहे की अयोग्य?

गुरुजी- अगदी अयोग्यॐ ( असे म्हणून गुरुजी व सहकारी जातात)

हिरण्यकशिपू- प्रधाऩ राज्यात गुढ्या, तोरणे उभी करा, हत्तीवरून शर्करा वाटा आणि गुरुजीस पाचारण करा (गुरुजी येतात. हिरण्यकशिपू वंदन करतो)

गुरुजी - राजा़ मी स्नान, संध्या करतेवेळी आपले आमंत्रण कशासाठीॠ

हिरण्यकशिपू- गुरुमहाराज, आपल्या म्हणण्याप्रमाणे मला पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याचे नामकरण करावे.

गुरुजी - राजा़ ते आमचेच काम आहे. ना-या़ आज तिथी कोणती, वार कोणता, नक्षत्र कोणते, प्रहर कोणता आता राग कोणता, नक्षत्र कोणते म्हणजे (मनामध्ये विचार करून) ना-या आजच्या वेळेनुसार मुलाचे नाव.

हिरण्यकशिपू- प्रधाऩ पुत्रास भेटीस आण.

प्रल्हाद - गुरु महाराज, वंदन करतो. तात महाराज वंदन करतो.

हिरण्यकशिपू- गुरु महाराज प्रल्हादास विद्याभ्यास शिकवा.
(हिरण्यकशिपू गुरुजीस वंदन करून निघून जातो)

गुरुजी - प्रल्हाद बैस ना-या डोळे कसे आहेत रे ?

ना-या - लोण्याचे गोळे

गुरुजी - माझ्या कशा मांड्या ?

ना-या - पालखीच्या दांड्या

गुरुजी - प्रल्हाद, मी सांगतो तसे म्हण श्री ग णे शा य न मः

प्रल्हाद- नारायण

गुरुजी- ना-या प्रल्हाद नारायण म्हणतो योग्य की अयोग्य?

ना-या - अगदी अयोग्यॐ

गुरुजी - प्रल्हादा़ मी सांगतो तसे म्हण श्री गणराजा

प्रल्हाद - भटाचा मेला आजा

गुरुजी - वाॐ सुरेखॐ ना-या काय म्हणतो ऐक ना-या माझ्या स्नान संध्येची वेळ झाली आहे तेव्हा तू याला पुढील अभ्यास शिकव नाहीतर समोर गुढी पाहिलीस नां त्यावर तुला व त्याला टांगून ठेवीन. नीट अभ्यास शिकव. मी येतो (गुरुजी जातात)

पद- गड्यांनो घ्या हरीच्या नामा । लिहिता कशास ओ नामा ।।धृ।।
सांगतो ऐका एक वर्मा । पहावे भागवती धर्मा ।।१।।
दुःख असे प्राप्त होय शर्मा । यत्न त्या कशास रे वर्मा ।
न पहावे हरि वाचून क्षेमा । लिहिता कशास ओ नामा ।।२।।
शरण सदगुरुला जावे । हरी भजनी लागावे।
हरीते सगुण रूप पहावे । निर्मल भावे पुजावे ।
नेईल हरी तो निजधामा । लिहिता कशास ओ नामा ।।३।।
गृहधन सुतयाची ममता । धरुनी व्यर्थची का नमता ।
हृदयी वागवू नी समता । हरी चरणासी तू नमिता ।
सोडूनी हृदयातील कामा । लिहिता कशास रे नामा ।।४।।
(पद सांगताना प्रल्हाद व त्याचे सवंगडी नाचत खेळत असतात तेवढ्यात गुरुजी येतात)

गुरुजी - ना-या, केशा, प्रल्हादा (प्रत्येकास काठीने मारून जागेवर बसवतात) प्रल्हाद माझ्या शाळेतील सर्व मुले वेडी करून टाकलीस आता तुला बापाच्या स्वाधीन करतो. (प्रल्हाद व सर्व सहकारी व गुरुजी निघून जातात.)

हिरण्यकशिपू- गुरुजींस वंदन करतो (गुरुजी व प्रल्हाद येतात प्रल्हाद वंदन करतो)

गुरुजी - राजा, या तुझ्या मुलाने माझ्या शाळेतील सर्व मुले वेडी करून टाकली आहेत, तेव्हा हा तुझा मुलगा व तू हवं ते कर मी जातो.

हिरण्यकशिपू- प्रल्हाद ये बैस सकाळी उठावे मुखमार्जन करावे, माता-पिता यांचे दर्शन घ्यावे, सहस्र ब्राह्मण गोळा करावेत व त्यांचे ताडन करावे.

प्रल्हाद - त्यांचे पालन करावे (ओ हो म्हणून हिरण्यकशिपू रागाने पहातो)

हिरण्यकशिपू- प्रधान ह्या कार्ट्याला अग्निकुंडात लोटून देणे.

सेवक - ठीक आहे (प्रल्हाद व सेवक निघून जातात)
(सेवक व प्रल्हाद नाचत येतात पद चालू होते.

पद- पावना वामना यामना हे तव भजनी निरंतर यातना ।
भा प्रल्हाद प्रल्हाद हरिरूपा । मातला निशाचर कंदना ।।१।।
हे तव भजनी निरंतर यातना ।।
श्रीधरा श्रीकरा श्रीवरा । हे मन रंगले तव अर्चनी श्रीधरा ।
पावना यामना यामना ।

प्रल्हाद - तात महाराज, वंदन करतो.

हिरण्यकशिपू- प्रधान, कार्टा कोठून उत्पन्न झाला ऋ

ओवी - अग्निकुंड प्रदीप्त करूनी । प्रल्हादासी आत टाकुनी ।

तेणे हरीहर नाम स्मरूनी । शांत केला अग्नी ते ।

सेवक - महाराज, अग्नि शांत झाला.

हिरण्यकशिपू- प्रधान , कार्टयाला सागरात लोटून दया.

सेवक - ठीक आहे. (सेवक, प्रल्हाद जातात)

पद- दोन्ही कडे चंद्रभागा । कैसा येऊ पाडुरंगा ।
अघाडी चाले रामराजा । पिछाडी संतन की फौजा ।

प्रल्हाद - तात महाराज, वंदन करतो.

हिरण्यकशिपू - प्रधान, कार्टा कोठून उत्पन्न झाला?

ओवी - सागरी बुडविता प्रल्हादासी । धावा बोले श्रीहरीसी ।
नौका उत्पन्न होउनी त्यासी । स्वये तारिले नारायणे ।

सेवक - महाराज, सागरात नौका उत्पन्न झाली.

हिरण्यकशिपू- सागरात नौका उत्पन्न झाली काय काही चिंता नाही. प्रधान कार्ट्याला कड्यावरून लोटून द्या.

सेवक - ठीक आहे (सेवक व प्रधान जातात.)

पद- श्रीहरी नारायण जगतात । व्हावे भजन-पूजन दिनरात ।।धृ।।
निर्मियले जग सारे । सब त्याचीच लेकुरे ।
जग सारे मोहपाशात । व्हावे भजन-पूजन दिनरात ।।1।।
वाल्या कोळी पापी फार । जगी झाला असे भू भार ।
नारद भेटे वनात । रामायण रचित क्षणात ।।2।।
तो अजामेळ चांडाळे । एकुलता त्यासी बाळ ।
नाम घेता अजित मुखात । झाला मोक्ष संसाराचा ।।3।।

प्रल्हाद- तात महाराज, वंदन करतो.

हिरण्यकशिपू- प्रधान, कार्टा कोठून उत्पन्न झाला? (सेवक व प्रधान येतात व वंदन करतात.)

श्लोक - न मरे या स्तवनेला । पर्वत शिखरासी लोटीला खोली ।
तरी तो निर्भय चित्ती । वाहे नारायणासी लाखोली ।।

हिरण्यकशिपू- प्रधान, कयादूस पाचारण करा.

कयादू - प्राणनाथ, नमस्कार करते.

हिरण्यकशिपू - प्रिये, कार्ट्याने दैत्य कुलास कलंक लावला एवढ्यासाठी कार्ट्याला विष देऊन ठार मारून टाक.

कयादू - महाराज, ज्या हाताने मी त्यास ओंजारलं, गोंजारलं, खेळवलं त्याच हाताने मला त्यास विष देवून ठार मारण्यास सांगता त्यापेक्षा त्याला एखाद्या अरण्यात सोडून द्या.

हिरण्यकशिपू - प्रिये, माझ्या शब्दाचे उल्लंघन करशील तर एक घाव दोन तुकडे करीन (निघून जातो)

पद कयादू माय काय बोलली श्रमली शीती थरथरली ।
बालबोल मनी न धरणे न मारणे योग्य सोडणे ।।
नचले यत्न म्हणूनी मुल करी आली घरी ।

शोक बहु करी ।।
कयादू माय काय बोलली श्रमली शीती थरथरली ।। (3 वेळा)

प्रल्हाद - आई, दे तो विषाचा पेला मी घेऊन टाकतो ते विष (कयादू व प्रल्हाद निघून जातात)

हिरण्यकशिपू - प्रधान, कार्ट्याला कुठून उत्पन्न झाला?

गाणं - त्याची भक्तासाठी लाच । जगी दास होउनी आलो ।
निजमुखातील बोरे । दे शबरी नीज स्वकरी ।
ती सेवूनी निर्धारे । संतुष्ट मानसी झालो ।।
त्यासी भक्तासाठी लाज । जगी दास होउनी आलो ।
अती बळी जळी स्थळीला । तो दुष्ट काय मजला ।
बळी पाताळी नेला । त्याचा दास होउनी आलो ।।
त्याची भक्तासाठी लाच । जगी दास होउनी आलो ।

प्रल्हाद - तात, महाराज वंदन करतो.

हिरण्यकशिपू - कार्टा कोठून उत्पन्न झाला?

ओवी - विष झाले अमृतासमान । तेणे स्मरिताची नारायण ।
चवी घेत केले पान । प्रल्हादाने ते जाण राया ।(2 वेळा म्हणावे)

हिरण्यकशिपू- विष अमृतासमान झाले काय. काही चिंता नाही कार्ट्या तुझ्याशी खडग युद्ध करून तुझे तुकडे तुकडे तुकडे करुन टाकतो (युद्ध होते)
कार्ट्या तुझा त्राता कुठे आहे रे?

प्रल्हाद - सर्व ठिकाणी आहे.

हिरण्यकशिपू - तो कसा आहे रे?

प्रल्हाद - सांगतो ऐकून घ्या.

पद - पसरट मुख मोठे ।। आत दढा कराळा ।।
परमचपळ जिव्हा ।। खड्ग जैसे लव्हाळा ।।
नयन युगल जोडी ।। तापले हेमपाणी ।।
दशभुज नखशस्त्रे ।। देखीला चक्रपाणी ।।
उठी रे मुठा ।। पोट तुझे विदारी ।।

हिरण्यकशिपू- असा आहे काय काही चिंता नाही. माझ्या हृदयात आहे?

प्रल्हाद - आहे.

हिरण्यकशिपू - तुझ्या हृदयात आहे?

प्रल्हाद - आहे.

हिरण्यकशिपू - या स्तंभात आहे ?

प्रल्हाद- आहे.

हिरण्यकशिपू - लाथ मारल्यास बाहेर पडेल.

प्रल्हाद - हो बाहेर पडेल (प्रल्हाद बाजूला होतो)

(हिरण्यकशिपू लाथ मारतो. नरसिंह बाहेर पडतो )

पद- राम कृष्णहरी मुकुंद नर-हरी
अच्युत नरहरी नारायणा ।
भार्गवराम श्री भार्गवराम । भार्गवराम श्री भार्गवराम ।
(पडदा पडतो)

**अंक - 6 वा**

रावण- प्रधान, ही नगरी कोणाची आहेॠ

प्रधान - महाराज़ ही नगरी जनक राजाची आहेॠ

रावण - या नगरीमध्ये आनंद उत्सव चालला आहे. नाना त-हेचे मंडप शृंगारले आहेत. नानात-हेची मंगल वाद्य वाजत आहेत असे येथे काय चालले आहे रे ?

प्रधान - महाराज, सीता स्वयंवर चालले आहे.

रावण - सीता स्वयंवर चालले आहे काय. काही चिंता नाही. जनका हे देशोदेशीचे राजे पत्राशिवाय आले आहे की पत्रे गेली होती रे ?

जनक - सर्वांना पत्र गेली होती.

रावण - मी चौदा चौकड्यांचा राजा रावण असून मला पत्र का नाही बोल !

जनक - आपणास पत्र पाठवले होतेल्ल परंतु आपल्या राज्या भोवती सुदर्शनचक्र फिरत होते त्यामुळे आपणास पत्र मिळाले नाही.

रावण - काही चिंता नाही. कन्येला बोलावून माळ घालण्यास सांग.

जनक - येथे धन्युष्याचा पण लावला आहे.

रावण - छी ! ह्या राजा रावणापुढे या यःकश्चित तिरकाट्याचा पण लावलास काय. अरे मी लहानपणी आईजवळ खेळत होतो त्यावेळी माझी आई काय करीत असे? मृत्तिकेचे लिंग करून त्याची पूजा करीत असे. त्यावेळी मी आईला असे विचारले की माते तू ही सेवा कोणाची करीत आहेस? तेव्हा माता म्हणाली. बाळ तुझे आयुष्य चिरायु होण्याकरिता तुझ्या स्वामींची सेवा करीत आहे. त्याचवेळी मी मातेला असा प्रश्न केला असा माझा स्वामी कोण आणि कुठे आहेॠ त्यावेळी आई म्हणाली जो कैलासवासी शंकर तो तुझा स्वामी. जनका, हे ऐकून मी कैलासी गेलो आणि आपल्या बाहुबलाने कैलास पर्वत गदगद गदगद हलवून दिला त्यावेळी शंकर आणि पार्वती कैलासात द्युत खेळत होती तेव्हा पार्वती शंकरास म्हणाली़ एकाएकी हा कैलास पर्वत हलू लागला याचे कारण काय? तर शंकर पार्वतीस म्हणाले, आपला भक्त राजा रावण हा कौतुकाने कैलास पर्वत हलवीत आहे. त्यावेळी शंकराने आपला डावा हात त्या पर्वतावर ठेवला त्यावेळी तो पर्वत हलेनासा झाला असे पाहून मी कैलासी गेलो. आणि तात महाराजांची अशी स्तुती केली - हे शंकरा, पशुपते, गंगाधरा, पिनाकपाणी, डमरुधरा, हे भोलानाथा शंकरा, मी तुम्हाला शरण आलो आहे. तेव्हा तुमची षोडशोपचारे पूजा करीत आहे.ती ग्रहण करावी त्यावेळी मी आपले सर्वांगांचे तंतू काढून वाद्य वाजविली. त्यावेळी शंकर प्रसन्न होऊन चौदा चौकड्यांचे राज्य मला दिले, असा मी पराक्रमी राजा रावण असून माझ्यासारखा पराक्रमी जगात तुला कुठे मिळणार आहे रे. जनका, हे देशोदेशींचे राजे मला केवळ भिंतीवर काढलेल्या चित्राप्रमाणे दिसत आहेत. जनका, कन्येला लवकर बोलावून माळ घालण्यास सांग.

जनक- येथे धनुष्यासारखा पण लावला आहे या धनुष्याला उचलून जो बाण लावील त्याला सीता माळ घालील.

रावण - छील्ल असे माझ्या जवळ संपत्ती असताना या क्षुल्लक धनुष्याचा पण मजपुढे लावलास कायॠ जनका़ आणखी सांगतो ऐक - सर्व देवतांमध्ये श्रेष्ठ इंद्र तो माझ्याकडे शिवाला पुष्पे आणतो, अग्नि वस्त्रे धुतो, चंद्र सूर्य मशाल धरतात, वायू केर काढतो, खंड्या हजामत करतो, असे हे तेहतीस कोटी देव मी ठिकठिकाणी हुद्द्यांवर लावले आहेत असा माझा पराक्रम असूनही यःकश्चित धनुष्याचा पण या राजा रावणापुढे लावला आहेस काय? अरे ज्या वेळेस माझा मेघनाथ जन्मला त्यावेळेस त्याने मेघासारखी गर्जना केली तेव्हा त्याचे मेघनाथ असे नाव ठेवले. त्याने तीन वेळा इंद्राला जिंकल्यामुळे इंद्रजीत असे

नाव ठेवले असे एकापेक्षा एक पराक्रमी पुत्र अतिकाया, महाकाया, नराकांत, सुबकांत व कुंभकर्णासारखा भाऊ! अती वर्णन काय करावयाचे आहे? असे माझे भाऊ व पुत्र पराक्रमी असताना या धनुष्याचा पण मजपुढे लावलास काय? काही चिंता नाही. या धनुष्याचे आता चूर्णचूर्ण करून टाकतो धनुष्याची बिशाद काय? (धनुष्य उचलण्यास जातो ते छातीवर पडते)

रावण - प्रधाना, जनकास जाऊन सांग तुझ्या कन्येच्या स्वयंवरामध्ये ब्रह्महत्या होत आहे रे! जीव चालला रे चालला. वाचव रे वाचव दशमुखांतून रक्त वाहू लागले आहे जीव चालला रे चालला!

(राम उठून डाव्या पायाच्या अंगठ्याने धनुष्य उडवितो )

रावण - जनका, या राजा रावणाच्या छातीवर धनुष्य पडला म्हणून राजा रावण लज्जित झाला असे समजू नकोस ह्या सीतेला एक ना एक वेळ लंकेमध्ये घेऊन जाईन तरच नावाचा राजा रावण होईन! स्वस्थ बैस ! (गमन करतो ) (रावण जातो.)